# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com

आता डिजिटल स्वरूपात...

दिवा न्यूज़ची वेबसाईट सुरू..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज़ वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com

▶ वर्ष–२ ■ अंक–३५ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, ३ एप्रिल २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


## दूषित पाणीपुरवठ्याने आमच्या चिमुकलीचा जीव घेतला, दिव्यातील रसाळ कुटुंबीयांचा टाहो



**दिवा (विशेष प्रतिनिधी) : –** दूषित पाणीपुरवठ्याने आमच्या सहा वर्षाच्या मुलीचा जीव घेतला असा टाहो दिवा शहरातील गणेश नगर भागातील रसाल कुटुंबीयांनी फोडला आहे. सुशीला रसाळ यांची नात मानसी रसाळ तिचे वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी काविळीने निधन झाल्याने रसाळ कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.


दिवा शहरात बहुतांश भागात इमारती व चाळींना पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन या गटारातून टाकण्यात आलेल्या आहेत. यातील अनेक पाण्याच्या लाईन या अनेक ठिकाणी लिकेज असल्याने त्यातून नागरिकांना दूषित पाणीपुरवठा होत असल्याची ओरड शहरातील नागरिक वारंवार करत असतात.मात्र पालिका प्रशासनाचा पाणीपुरवठा विभाग ढम्म असल्याने नागरिकांना तक्रारी करूनही न्याय मिळत नाही.

मानसी रसाळ ही अवघ्या ६ वर्षांची चिमुकली गंभीर स्वरूपाच्या कावीळ आजाराची बळी ठरली आहे.तिच्या कुटूंबियांनी उपचारासाठी तिला नायर रुग्णालयात दाखल केले होते १२ दिवस त्या चिमुकलीने मृत्यूशी झुंज दिली.मंगळवारी २८ मार्चला तिचे दुर्दैवी निधन झाले. हसती खेळती मुलगी आपल्याला सोडून गेल्याने रसाळ कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.शहरात होणारा दूषित पाणीपुरवठा मानसीच्या मृत्यूस कारणीभूत असल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

> *आमची पोरगी कावीळ झाल्याने गेली पण ही वेळ शहरातील अन्य कुणावर येऊ नये म्हणून आतातरी दिवा शहरात स्वच्छ पाणीपुरवठा करा,दूषित पाण्यामुळे अनेकांना कावीळ होत आहे.*
>
> *– सुशीला रसाळ, मानसीची आजी*

> *दिवा शहरात पालिकेचे सुसज्ज रुग्णालय असते तर मानसीच्या आजाराचे वेळेत निदान होऊन वेळेत उपचार झाले असते. पालिकेने येथील नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून तातडीने रुग्णालय संबंधी निर्णय घ्यावा, शहरातील नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी उपाययोजना कराव्यात!*
>
> *– ज्योती पाटील, महिला अध्यक्षा, भाजप*

## नागरिकांनी चप्पल बाहेर काढून यायचं, अधिकारी मात्र चप्पल घालून कार्यालयात बसणार?



डोंबिवली पासपोर्ट कार्यालय येथील प्रकार, जनतेसोबत भेदभाव करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करा –शिवाजी आव्हाड

**डोंबिवली:–** डोंबिवली पासपोर्ट कार्यालयात नागरिकांना शूज चप्पल कार्यालया बाहेर काढण्याची सक्ती करणारे व स्वतः बूट चप्पल घालून कार्यालयात बसणारे कर्मचारी यांच्यावर नागरिकांचा अवमान करत असल्या प्रकरणी कारवाई करण्यात यावी अशी मागणी भाजपा भटके विमुक्त आघाडीचे प्रदेश सरचिटणीस शिवाजी आव्हाड यांनी केली आहे.

डोंबिवली पासपोर्ट कार्यालय येथे तेथील कर्मचाऱ्यांची मनमानी सुरू असल्याचा प्रकार भाजप नेते शिवाजी आव्हाड यांनी उघडकीस आणला आहे.आव्हाड हे या कार्यालयात कामानिमित्त गेले असता त्यांच्या हा प्रकार निदर्शनास आला. या प्रकारामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला, सर्वसामान्य नागरिक यांना प्रचंड मानसिक त्रास होत असल्याचे आव्हाड यांनी म्हटले आहे.येथील कर्मचारी सरसकट सर्वच नागरिकांना शूज,चप्पल कार्यालय बाहेर काढण्याची सक्ती करतात. मात्र स्वतः येथील कर्मचारी कार्यालयात शूज व चप्पल घालून बसतात. नागरिकांनाच शूज चप्पल बाहेर काढण्याची सक्ती का? असा सवाल शिवाजी आव्हाड यांनी उपस्थित केला आहे. नागरिकांशी भेदभाव करत सर्वसामान्य नागरिकांचा अवमान करणाऱ्या या कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचे शिवाजी आव्हाड यांनी म्हटले आहे. स्वच्छतेच्या कारणास्तव जर चप्पल शूज बाहेर काढण्याची पद्धत असेल तर स्वतः कर्मचाऱ्यांनी सुद्धा स्वतःची चप्पल आणि शूज हे बाहेर काढायला हवेत असे शिवाजी आव्हाड यांनी म्हटले असून या उद्धट व मनमानी करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर तातडीने कारवाईसाठी आपण संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेणार असल्याचेही भाजपने ते शिवाजी आव्हाड यांनी सांगितले आहे.

# स्वच्छतेबद्दलच्या जागृतीसाठी ठाण्यात निघाला स्वच्छता मशाल मार्च




## नागरिक, स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी यांचा सहभाग

**ठाणे :** स्वच्छ शहराच्या जनजागृतीसाठी ठाणे महापालिकेतर्फे बुधवारी सकाळी ठाणे शहरात 'स्वच्छता मशाल मार्च'चे आयोजन करण्यात आले होते. स्वच्छोत्सव -२०२३ अंतर्गत शहरातील नागरिकांमध्ये शून्य कचरा मोहिमेबद्दल जागृती करण्यासाठी तसेच नागरिकांचा कृतीशील सहभाग नोंदवण्यासाठी या मार्चचे आयोजन करण्यात आले होते.

कोर्ट नाका चौक ते शहीद उद्यान या मार्गावर झालेल्या या स्वच्छता मशाल मार्चमध्ये नागरिक, स्वयंसेवी संस्था यांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. महापालिकेच्या घनकचरा विभागाचे उपायुक्त तुषार पवार आणि समाज विकास विभागाच्या उपायुक्त वर्षा दीक्षीत यांनी सहभागी नागरिकांचे स्वागत केले. शहीद उद्यानात स्वच्छता मोहिमेचेही आयोजन करण्यात आहे. त्याचवेळी उपस्थितांनी शहर स्वच्छ राखण्याची प्रतिज्ञा केली. एकल वापराचे प्लास्टिक आणि थर्माकोल यांचा वापर टाळणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, शून्य कचऱ्याचे उद्दीष्ट साध्य होईल, अशा जीवनशैलीचा अंगीकार करणे याचे स्मरण या प्रतिज्ञेच्या निमित्ताने करून देण्यात आले. 'चला ठाणे बदलूया' या उपक्रमांतर्गत महिला वॉर्ड कॅप्टनचा या कार्यक्रमात गौरव करण्यात आला.

## डंपर चालक जखमी

**ठाणे:** मुलुंड डंपिंग ग्राउंड येथून भिवंडी,मानकोली, येथे जाताना मुंबई-नाशिक महामार्गावरील लुईसवाडी येथे एका डंपर चालकाने अचानक ब्रेक दाबला. त्याचवेळी पाठीमागून आलेल्या दुसऱ्या डंपरने त्या डंपरला जोरदार धडक दिल्याची घटना मंगळवारी रात्री सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास घडली. यावेळी धडक देणाऱ्या डंपरचालक राहुल गूजागर (२३) हा त्याच डंपरमध्ये अडकला होता. त्याला आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी व अग्निशमन दलाच्या जवानांनी बाहेर काढले. या अपघातात त्याच्या दोन्ही पायाला दुखापत झाल्याने कळवा, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले आहे. जखमी चालक गुजागर हा १८ टन भंगारने भरलेला डंपर घेऊन निघाला होता. तर अपघात ग्रस्त वाहने रस्त्याच्या एका बाजूला करून तो महामार्ग वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## झाड कोसळले

**ठाणे:** गोकुळ नगर,जरी मारी आई मंदिर जवळ रस्त्यावरील झाड कोसळल्याची घटना बुधवारी मध्यरात्री दीड वाजण्याच्या सुमारास घडली. सुदैवाने यामध्ये कोणालाही दुखापत झालेली नाही. घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली. तसेच झाड कापून एका बाजूला केले.

## रोडवरती सांडले तेल

**ठाणे:** पोखरण रोड नंबर ०१, समता नगर या ठिकाणी असलेल्या सिंघानिया शाळेसमोर रस्त्यावर अनोळखी वाहनामधून तेल सांडल्याची घटना बुधवारी दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी धाव घेत, सांडलेल्या तेलावर माती पसरवून तो रस्ता वाहतुकीसाठी मोकळा केला अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफिस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

## पोक्सो गुन्ह्यात आरोपीला सात वर्षे सश्रम कारावास

**ठाणे:** नवी मुंबईतील १४ वर्षीय अल्पवयनी मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या दक्ष उर्फ डॅनियल सुझान आव्हाड (२०) याला ठाणे जिल्हा व सत्र न्यायाधीक्ष व्ही. व्ही. वीरकर यांनी मंगळवारी दोषी ठरवून त्याला सात वर्षे सश्रम कारावास तसेच सहा हजार रुपये दंडाची शिक्षासुनावली. तर दंड न भरल्यास दोन महिने साध्या कारावासाची अतिरिक्त शिक्षाही भोगावी लागणार असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

पीडित मुलगी (१४) १९ जुलै २०१८ रोजी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास तिचा मित्र दक्ष याच्यासमवेत गार्डनमध्ये फिरायला नेले. त्यानंतर त्याने तिला फूस लावून पळवून नेले. तिथेच तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. याप्रकरणी वाशी पोलिस ठाण्यात बलात्कारासह पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. वरिष्ठ पोलिस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलिस निरीक्षक नितीन राठोड यांच्या पथकाने आरोपी दक्षला अटक केली होती. हा न्यायाधीक्ष व्ही व्ही वीरकर आल्यावर २८ मार्च २०२३ रोजी सरकारी वकिल रेखा हिवराळे यांनी सादर केलेल्या नऊ साक्षीदारांची साक्ष तसेच आरोपीच्या विरुद्ध पुरावे सादर करुन पिडितेची जोरदार बाजू मांडली. त्याच्या आधारे आरोपीला दोषी ठरवून सात वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली.

## ठाण्यातील काही भागात ३० दिवस १५% पाणीकपात

**ठाणे :** बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्राला पाणीपुरवठा करणाऱ्या जलबोगद्याला गळती निर्माण झाली असून या जलबोगद्याच्या दुरूस्तीचे काम शुक्रवार येत्या ३१ मार्च पासून हाती घेण्यात येणार आहे. या दुरुस्तीच्या कारणास्तव बृहन्मुंबई महापालिका क्षेत्राला होणाऱ्या पाणीपुरवठ्यात ३१ मार्च २०२३ पासून पुढील ३० दिवस १५% पाणी कपात लागू राहणार आहे. परिणामी ठाणे महापालिका क्षेत्रात मुंबई महापालिकेच्यावतीने पाणीपुरवठा केल्या जाणाऱ्या परिसराला देखील पाणी कपात लागू राहणार आहे.

ठाणे महापालिका क्षेत्रात पाणी कपात पुढील परिसरांना लागू राहणार आहे. गावदेवी जलकुंभावरुन पाणीपुरवठा होणारा परिसर - नौपाडा, गोखले रोड, स्टेशन परिसर, बी केबीन, राम मारुती मार्ग उजवी बाजू, महागिरी, खारकर आळी, चेंदणी, खारटन रोड, मार्केट परिसर. टेकडी बंगला जलकुंभावरुन पाणीपुरवठा होणारा परिसर - टेकडी बंगला, वीर सावरकरपथ, संत गजानन महाराज मंदिर पर्यंत, पाचपाखाडी, नामदेववाडी, भक्ती मंदिर रस्ता, सर्व्हिस रस्ता. कोपरी कन्हैयानगर व धोबीघाट जलकुंभावरुन पाणीपुरवठा होणारा परिसर - कोपरी गाव, ठाणेकरवाडी, सिंधी कॉलनी, साईनाथनगर, साईनगर, कोळीवाडा, सिडको संपूर्ण कोपरी (पूर्व), आनंदनगर, गांधीनगर, कान्हेवाडी, केदारेश्वर, संपूर्ण ठाणे पूर्व परिसर. हाजुरी कनेक्शन मार्फत थेट पाणीपुरवठा - लुईसवाडी, काजुवाडी, हाजूरी गाव, रघुनाथनगर, जिजामाता नगर, साईनाथ नगर. किसननगर कनेक्शन मार्फत थेट पाणी पुरवठा -किसननगर १, किसननगर २, किसननगर ३, शिवाजीनगर, पडवळनगर, डिसोझावाडी. अंबिकानगर कनेक्शनमार्फत थेट पाणीपुरवठा - अंबिकानगर २, ज्ञानेश्वरनगर, जयभवानी नगर, राजीव गांधी नगर. ही कपात केली जाणार आहे.तरी पाणीकपात कालावधीत नागरिकांनी पाण्याचा योग्य वापर करावा व ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन ठाणे महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८८०८९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com
सोमवार, ३ एप्रिल २०२३


# दिव्यामध्ये खर्डी गावात ब्राईटन इंटरनॅशनल शाळेचे उद्घाटन

**खर्डी:-(एस.सुदेश )** खर्डी गावात ब्राईटन इंटरनॅशनल शाळेचे उद्घाटन मोठ्या उत्साहात करण्यात आले. उद्घाटन झाल्यानंतर नवीन शाळेत प्रवेश प्रक्रियाही सुरु झाली असल्याचे शाळेचे संचालक श्री. महाजन सर व श्री. राकेश सर यांनी सांगितले . केजी ते इयत्ता १० वी पर्यंत सी.बी.एस.सी. बोर्डचे शिक्षण या शाळेत दिले जाणार असून अनुभवी शिक्षकांकडून मार्गदर्शन मिळणार आहे.

यावेळी ब्राईटन इंटरनॅशनल शाळेचे उद्घाटन मा. नगरसेवक व उद्योजक श्री.बाबाजी बाळाराम पाटील व मा.नगरसेवक तुळशीराम विठ्ठल चौधरी(अंबरनाथ) व उत्तरप्रदेश मध्ये शिक्षण क्षेत्रात वेगळी ओळख बनवणारे मा.श्री.सुभाषचंद्र त्रिपाठी यांच्याहस्ते करण्यात आले. शाळेचे मुख्याध्यापक श्री.डी.एस. सर व सर्व शिक्षकवृंद तसेच इतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.संपन्नता भगत व कु.मोहिनी मॅडम यांनी केले. कार्यक्रमाची सांगता श्री.जय सर व कु.राहुल सर यांनी आभार मानून केली.



# सक्षम कन्या विकास संस्था, जिजाऊ ब्रिगेड व एकल महिला पुनर्वसन समिती यांच्या संयुक्त विद्यामाने महिला दिनाचे आयोजन

**डोंबिवली:-** साई पॅरेडेस डोंबिवली येथे एकल महिला पुनर्वसन समिती सक्षम कन्या विकास संस्था व जिजाऊ ब्रिगेड यांच्या माध्यमातून जागतिक महिला दिन २६ मार्च रोजी आयोजित करण्यात आला.

समाजातील स्त्री शक्तीचा सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती मा. रमेश जोशी, मा. अंजली भोसले, मा. विनोद म्हात्रे, मा. बालाजी आयर, मा. आनंद ठोसर, मा. सुलेखा कोयंडे, मा. अभिनेत्री चित्रा दीक्षित,संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा विद्याताई गडाख आदी मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याच्या मानकरी ड.सुजाता माने, ड.अनिता जगताप,अनिता बागड (एसटी कंडक्टर), नैनीता कर्णिक सेवानिवृत्त (मुख्याध्यापिका), रीना जाधव (समाजसेविका), आरती पांचाळ (शिक्षिका), ज्योती पाटील (सर्पमित्र), मनीषा माटे छाया कांबळे (समाजसेविका), काजळे (व्यवसायिका), संघटना (समाजसेविका) यांचा गौरव करण्यात आला.या एकल महिला अनेक क्षेत्रांमध्ये वेगवेगळे कार्य करत आहे व सर्व समाजसेविका आहेत संघर्ष करत सक्षम होत आहेत व पीडित व गरजू महिलांना व बालकांना नागरिकांना मदत करत आहेत.समाजकार्य करत असताना संस्थेच्या अध्यक्षा विद्याताई गडाख यांनी दखल घेतली व जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आदर्श स्त्री शक्ती पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. आर जे पॅपोलोन निधीचे सहकारी कांचन कांबळे आणि संस्थेच्या कार्यकर्त्या योगिता पवार, भावना माळकर, भारती कडलक, वैष्णवी पडवळ, निकिता पठारे, समिधा आधारे, सुनंदा शिंदे, विमल घोडके, मनीषा मोरे, आशा लेडे, अंजली साबळे, अक्षरा पाटील, सीमा जाधव यांनी सूत्रसंचालन केले मोठ्या उत्साहात कार्यक्रम पार पडला.




# ज्योती पाटील यांनी रसाळ कुटुंबियांची भेट घेत केले सांत्वन, रसाळ कुटुंबियांच्या पाठीशी उभे राहण्याचा दिला विश्वास



**दिवा:-**दिव्यातील गणेश नगर येथील मानसी रसाळ या सहा वर्षाच्या चिमुकलीचा नुकताच काविळीमुळे मृत्यू झाला .दिव्यातील दूषित पाण्यामुळे मानसीला जीव गमवावा लागला असा आरोप तिच्या कुटुंबीयानी केला आहे.या घटनेनंतर भाजपच्या दिवा महिला अध्यक्षा ज्योती पाटील यांनी रसाळ कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केलं.

दूषित पाणीपुरवठ्यामुळे कावीळ होऊन आमची चिमुकली मृत्युमुखी पडल्याचा आरोप मानसी रसाळ हिच्या कुटुंबीयाने केला आहे.मानसी रसाळ हिच्या आजीने आपली नात गेल्याचे दुःख व्यक्त करताना दिव्यातील लहान मुलांना आजार होऊ नयेत म्हणून स्वच्छ पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्याची विनंती प्रशासनाला केली आहे. या कुटुंबीयांनी आपल्या भावना ज्योती पाटील यांच्याकडे व्यक्त केल्या. रसाळ कुटुंबीयांवर ओढवलेले संकट पाहून अतिशय दुःख झाल्याचे मत ज्योती पाटील यांनी व्यक्त केले अवघ्या सहा वर्षाच्या मानसीला काविळ सारख्या आजाराने जीव गमवावा लागला.दिव्यात शासकीय रुणालय नसल्याने येथील सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या आजाराबाबत वेळीच निदान होत नाही व वेळेत उपचार मिळत नाहीत परिणामी येथे सुसज्ज असे रुणालय होणे गरजेचे आहे अशी भावना ज्योती पाटील यांनी यावेळी व्यक्त केली. असाल कुटुंबीयांच्या पाठीशी महिला म्हणून आपण ठामपणे उभे असल्याचे ज्योती पाटील यांनी यावेळी सांगितले.

# चैत्र नवरात्र उत्सवात नवरत्न व नवदुर्गा पुरस्कार

**ठाणे:** आनंद चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित होत असलेल्या जांभळी नाका येथील शिवाजी मैदान चैत्रनवरात्रोत्सव २०२३ भक्ती व कला महोत्सवाच्या आठव्या दिवशी समाजामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या पुरुषांना नवरत्न व महिलांना नवदुर्गा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ. किशोर चिटणीस, डॉ. अमोल भानुशाली, श्री. राजन राजे, श्री. भटू सावंत, श्रीपाद भालेराव, सदानंद राणे, डॉ. रविराज अहिरराव, डॉ. संजय ओक, ॲड. जयदीप ठक्कर.

अश्विनी रणदिवे, नम्रता ओवळेकर, सुजाता सोपारकर, विजया पंडितराव, कायकिनी सिस्टर, कु. गृहीता विचारे, डॉ. प्रतीक्षा बोर्डे, कु. सई पाटील, अश्विनी कानोलकर.

या पुरस्कार सोहळ्यासाठी माजी आमदार मुझ्झफर हुसैन, लोकसभा संपर्क प्रमुख मधुकर देशमुख, नरेश मणेरा, प्रवक्ते चिंतामणी कारखानीस, उप जिल्हा प्रमुख रेखाताई खोपकर, माजी नगरसेविका नंदिनी विचारे उपस्थित होते.

या कार्यक्रमाला माजी आमदार सुभाष भोईर, मध्य रेल्वेचे मुख्य रेल्वे प्रबंधक रजनीश गोयल, झोन १ चे पोलीस उपायुक्त गणेश गावडे, सह पोलीस आयुक्त ढोले दांपत्य यांनी मनोभावे देवीचे विधिपूजा करून दर्शन घेतले.



# खासदार राजन विचारे यांचा असाही मदतीचा हात





## ज्येष्ठ शिवसैनिकासह तरुणीला केले पायावर उभे

**ठाणे:** २६ जानेवारी रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज मैदानात आयोजित केलेल्या महाआरोग्य शिबिरात खासदार राजन विचारे यांची नजर कु. रेश्मा घंटे व चंद्रकांत सुर्वे यांच्यावर पडली असताना असे निदर्शनास आले कि, उत्तम दर्जाचे कृत्रिम पाय हे जर्मनी मॉडेल असून अधिक खर्चिक असल्यामुळे त्यांना तो खर्च परवडणारा नव्हता. तात्काळ खासदार विचारे यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क करून या पायासाठी लागणारा एकूण ७ लाख २० हजार चा निधी उपलब्ध करून दिला. व त्यांना जर्मनी मॉडेल उत्तम दर्जाचे कृत्रिम पाय मिळवून दिले. आणि त्यांना पायावर उभे केले.

रेश्मा घंटे हिचा जन्मापासूनच एक पाय तोकडा होता. त्यामुळे हा पाय कापून नवीन कृत्रिम पाय बसवावा लागेल हे तिच्या समोर मोठे आव्हान होते. परंतु ती कुठेही डगमगली नाही. या तिच्या धाडसामुळे रेश्मा घंटे हिचा सत्कार करून सन्मानित करण्यात आले. तिने आपल्या आयुष्यातील २४ वर्ष वाया गेली परंतु आत्ता तिला नवीन पाय मिळाल्याने जगण्याची उमेद मिळाल्याने खासदार राजन विचारे यांचे आभार मानले. त्याचबरोबर श्रीरंग सोसायटी, राबोडी येथे राहणारे ज्येष्ठ शिवसैनिक चंद्रकांत सुर्वे यांनी समाजकारणात आयुष्य झोकून शिवसेना पक्षासाठी काम केले परंतु कोविड काळात त्यांच्या पायाला दुखापत झाल्यामुळे त्यांचा पाय कापावा लागला. त्यामुळे त्यांना घराबाहेर पडणे मुश्कील झाले. खासदार राजन विचारे यांच्या प्रयत्नाने त्यांना कृत्रिम पाय मिळाल्याने पुन्हा समाजामध्ये कार्य करण्याची त्यांची उमेद वाढली आहे. त्यामुळे त्यांनाही या कार्यक्रमात सन्मानित करून त्यांचा सत्कार केला.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमानिमित्त जिल्ह्यात महिनाभर विविध उपक्रमांचे आयोजन

**ठाणे :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जयंतीनिमित्त ठाणे जिल्ह्यात १ ते ३० एप्रिल या कालावधीत भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कालावधीत जिल्ह्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतीबा फुले यांच्या विचारावर आधारित वक्तृत्व स्पर्धा, स्वच्छता मोहिम, निबंध स्पर्धा, लघुनाट्य स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, स्वाधार योजनेविषयी माहिती देणे, आरोग्य शिबिर, मान्यवरांची भाषणे, संगीत रजनी आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ठाणे जिल्हा समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त समाधान इंगळे यांनी दिली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमाची माहिती देण्यासाठी आयोजित बैठकीत इंगळे यांनी ही माहिती दिली. यावेळी समाज कल्याण निरिक्षक महेश अळकुटे, अभिजीत शिंदे, कार्यालय अधिक्षक वर्षा बिलये आदी उपस्थित होते. इंगळे म्हणाले की, अनुसूचित जाती व सर्व प्रकारचे पीडीत शोषित असलेल्यांना सामाजिक न्याय, आर्थिक व सामाजिक संरक्षण उपलब्ध करून देण्याबाबत राज्य सरकार सातत्याने प्रयत्न करीत आहे. त्याअनुषंगाने अनुसूचित जाती, वंचित दुर्बल घटकांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय म्हणून विविध कल्याणकारी योजना राज्यभर राबविण्यात येत आहेत.



# जांभळी नाका येथील चैत्र नवरात्रोत्सव देवीचे विसर्जन

**ठाणे: आनंद चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित चैत्र नवरात्र उत्सवातील देवीची विसर्जन मिरवणूक मोठ्या उत्साहात पार पडली. विसर्जन मिरवणूक जांभळी नाका येथून बाजारपेठ – गडकरी रंगायतन मार्गे, अहिल्यादेवी होळकर घाट येथे देवीचे विसर्जन करण्यात आले.**

या मिरवणुकीत लेझीम पथक तसेच संपूर्ण ठाणे जिल्हयातून वारकरी सांप्रदायाचे वारकरी पथके, झांज पथक, बँड पथक, दांडपट्टा, महिलांचे व पुरुषांचे लेझीमपथक, घोडेस्वार, मावळे, वाडा मोकाडा येथून आलेले आदिवासी नृत्यकार असे अनेक परंपरागत नृत्य या मिरवणुकी मध्ये ठाणेकरांना पहावयास मिळाले. अशी जय्यत तयारी देवीच्या विसर्जनासाठी होती. या विसर्जन मिरवणुकी मध्ये अनेक ठाणेकर नागरिकांनी सहभाग घेतला होता. या विसर्जन मिरवणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महिला व पुरुष पदाधिकारी, युवासेना, युवतीसेना पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच हा एवढा मोठा उत्सव आपण यशस्वीरित्या साजरा करू शकलो. त्याबद्दल खासदार राजन विचारे यांनी संपूर्ण ठाणेकरांचे मन:पूर्वक आभार मानले

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
ताज्या घडामोडी वाचण्यासाठी लॉग इन करा
www.diwanews.com


# ठामपाच्या कोपरी प्रसूतिगृहात १८ पेट्यांचे विशेष नवजात केअर युनिट!

**ठाणे :** ठाणे महापालिकेचे ठाणे कोपरी पूर्व येथील शेठ लक्ष्मीचंद फतीचंद प्रसूतिगृहात चार स्त्रीरोग तज्ज्ञांच्या नियुक्तीसह १८ पेट्यांचे विशेष नवजात केअर युनिट (एसएनसीयू) उभारण्यास महापालिकेने मंजूरी दिली आहे. या निर्णयामुळे वेळेआधी जन्म येणाऱ्या व कमी वजनाच्या मुलांवर लगेचच उपचार मिळणार आहेत. त्यामुळे नवजात केअर युनिटसाठी करावी लागणारी पायपीट थांबण्यास मदत होणार असून नव्या ऋएसएनसीयू' युनिटमुळे माय-लेकाची ताटातूट टळणार आहे.

कोपरी येथील शेठ लक्ष्मीचंद फतीचंद प्रसूतिगृहाला विविध समस्यांनी ग्रासलेले होते. याबाबत अनेक तक्रारी देखील पालिका प्रशासनाकडे यापूर्वी प्राप्त झाल्या होत्या. याची गांभीर्याने दाखल घेत, पालिका प्रशासनाने या प्रसुतीगृहाचे कायपालट करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार टप्याटप्याने या प्रसूतीगृहात पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबरोबरच येथील समस्या सोडवीत अत्याधुनिक साधन सामुग्री उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे. त्यातच या प्रसूतिगृहात ऋएनआयसीयू' युनिट सुरू केले नव्हते. त्यामुळे वेळेआधी व कमी वजनाच्या मुलांना कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात हलवावे लागत होते. तर काही गरीब पालकांना कर्ज काढून, नवजात मुलाला खासगी हॉस्पिटलमधील ऋएनआयसीयू' दाखल करावे लागत होते. काही वेळा पॅनलवरील डॉक्टर वेळेत न आल्यामुळे मुलांवरील उपचाराला अडचणी येत होत्या. या संदर्भात माजी नगरसेवक भरत चव्हाण यांनीपालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर यांची भेट घेऊन लक्ष्मीचंद फतीचंद प्रसूतिगृहात विशेष नवजात केअर युनिट (एसएनसीयू) युनिट उभारण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार आयुक्त बांगर यांनी कोपरीतील ऋएसएनसीयू'साठी अर्थसंकल्पात तरतूद केली आहे. या ठिकाणी चार स्त्री रोग तज्ज्ञांच्या नियुक्तीसह १८ पेट्यांचे ऋएसएनसीयू' युनिट उभारले जाईल, अशी माहिती भरत चव्हाण यांनी दिली.

### माय-लेकाची ताटातूट टळणार!

**लक्ष्मीचंद फतीचंद प्रसूतिगृहात मातेची प्रसूती झाल्यानंतर कमी वजन व आजारी नवजात बालकांना छत्रपती शिवाजी महाराज हॉस्पिटलमध्ये हलविले जात होते. त्यावेळी माता कोपरीत, तर लेक कळव्याला अशी स्थिती निर्माण होत होती. अशा परिस्थितीत मातेच्या जीवाची घालमेल होत होती. तर नातेवाईकांची दोघांची काळजी घेताना धावपळ उडत होती. कोपरीत नव्याऋएसएनसीयू' युनिटमुळे माय-लेकाची ताटातूट टळणार आहे.**




**भारतीय जनता पार्टी व आदर्श मित्र मंडळ मार्फत मुंब्रा देवी कॉलनी येथे भाजपा कार्यालयात मोफत आरोग्य शिबिर पार पडले. सामाजिक कार्यकर्ते रोशन भगत यांनी या शिबिराचे आयोजन केले होते. (छाया:-सुदेश सपकाळ)**

# ठाणा कॉलेजजवळील रस्ता खचला




**ठाणे:** ठाणे महापालिकेमार्फत मलनिस्सारणाचे काम सुरू असल्याने खारटन रोड, ठाणा कॉलेजवळील शितला माता चौकात रस्ता खचल्याची घटना सोमवारी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास समोर आली. खचलेला रस्ता हा जवळपास १० ते १५ फुट खोल आणि २० ते २५ फूट लांब असा आहे. सुदैवाने या पडलेल्या भगदाडमध्ये कोणालाही दुखापत झालेली नाही. मात्र, याचा परिणाम वाहतुकीवर झाल्याने रात्री घरी परतणाऱ्या ठाणेकर नागरिकांचे चांगले हाल झाले आहेत. रस्ता खचल्याची बाब दक्ष नागरिक सचिन शिंदे यांनी महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाला दिली. माहिती मिळताच धाव घेतली. तसेच सुरक्षितेच्या दृष्टीने खबरदारी घेत, त्या रस्तावरून सुरू असलेली वाहतूक स्थानिक लोकांच्या मदतीने पूर्णपणे बंद करण्यात आली. ही घटना घडली त्यामध्ये सुदैवाने कोणालाही दुखापत झालेली नाही. मलनिस्सारणचे काम सुरु असल्याने तो रस्ता खचला असावा असा अंदाज वर्तवला जात आहे. हे काम सुरू असल्याने त्या रस्त्यावरील वाहतुकीला निर्बंध घालण्यात आले होते. मात्र येत्या दोन ते चार दिवस हा रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. असेही महापालिकेकडून सांगण्यात येत आहे.

# ठाण्यातील जुन्या रस्त्यांचे आयआयटी मार्फत लेखापरिक्षण करावे

## ठाणे काँग्रेसची मागणी

**ठाणे:**शहरात सुरु असलेल्या रस्त्यांची कामे गुणवत्तापुर्वक व्हावीत या उद्देशातून आयआयटीच्या पथकामार्फत या कामाचे लेखापरिक्षण सुरु करण्यात आले असून त्याच धर्तीवर शहरात यापुर्वी तयार करण्यात आलेल्या प्रमुख जुन्या रस्त्यांचे लेखापरिक्षणही या पथकामार्फत करण्यात यावे. जेणेकरून शहरात रस्ता खचण्याच्या घटना रोखण्याबरोबरच संभाव्य जिवीतहानी टाळणे शक्य होईल, अशी मागणी ठाणे काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते सचिन शिंदे यांनी केली.

ठाणे येथील खारटन रोड परिसरातील रस्ता हा पश्चिम रेल्वे स्थानक आणि कोपरी भागातील वाहतुकीसाठी महत्वाचा मानला जातो.या मार्गावर कळवा,कोपरी, साकेत,कशेळी आणि काल्हेरच्या दिशेने वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ सुरू असते.सोमवारी रात्री या मार्गावरील ठाणा कॉलेज जवळील शीतला माता चौक परिसरात रस्ता खचून त्याला मोठे भगदाड पडले. हा प्रकार पाहून स्थानिकांनी तात्काळ मार्गरोधक लावून हा रस्ता वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद केल्याने मोठा अनर्थ टळला.ठाणे शहरात यापुर्वी ठाण्यात सावरकर नगर,कोपरी आदी विविध ठिकाणी अशाच प्रकारे रस्ता खचण्याच्या घटना घडल्या असून सुदैवाने या घटनेत कोणतीही जिवीतहानी झालेली नाही.परंतु अशा घटना सातत्याने घडू लागल्याने त्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे,असेही शिंदे यांनी म्हटले आहे.

ठाणे शहरात रस्ते नुतनीकरणाची कामे सुरु आहेत. या कामांचा दर्जा कोणत्याही परिस्थितीत खालावू दिला जाणार नाही,अशी भुमिका घेत या कामांच्या लेखापरिक्षणासाठी आयआयटीतील ज्येष्ठ तज्ञांची नेमणुक करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी घेतला आहे.या निर्णयाची त्यांनी प्रत्यक्षात अमंलबजावणी सुरु देखील केली असून त्यांच्या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो,याच धर्तीवर त्यांनी शहरात यापुर्वी तयार करण्यात आलेल्या प्रमुख जुन्या रस्त्यांचे लेखापरिक्षणही या पथकामार्फत करण्यात यावे,जेणेकरून शहरात रस्ता खचण्याच्या घटना रोखण्याबरोबरच संभाव्य जिवीतहानी टाळणे शक्य होईल,अशी मागणी शेवटी सचिन शिंदे यांनी केली.

# कोकेन विक्रीसाठी आलेल्या दोघा नायजेरियनसह रिक्षाचालक जेरबंद

## ६१ लाखांचा मुद्देमाल जप्त



**ठाणे:** कासारवडवली,आनंदनगर आणि वागळे इस्टेट, इंदिरानगर या दोन वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या कारवाईत कोकेन व एलएसडी असे अंमली पदार्थ विक्रीसाठी आलेल्या पॉल चुकवु (४८) आणि गोक लॉरेन्स अजाह (३२) या दोघा नायजेरियन व्यक्तींसह रिक्षाचालक लक्ष्मण अनिरूध्द साव (२७) अशा तिघांना ठाणे शहर पोलिसांच्या वागळे इस्टेट गुन्हे शाखेच्या युनिट ५ जेरबंद केले. त्यांच्याकडून एकूण ६१ लाखांचा ऐवज जप्त केला आहे. यामध्ये १४७ ग्रॅम वजनाचा कोकेनचा समावेश आहे. तसेच ते दोन्ही नायजेरियन हे नालासोपारा येथे वास्तव्यास आल्याचे समोर आले आहे. अशी माहिती पोलिसांनी दिली.

वागळे युनिट ५ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके यांना २९ मार्च २०२३ रोजी घोडबंदर रोडवरील आनंदनगर येथे

पॉल चुकवु नामक नायजेरियन इसम हा कोकेन अंमली पदार्थ विक्रीसाठी येणार आहेत. अशी माहिती मिळाली. त्यानुसार कारवाई करत, त्याला ताब्यात घेतले. तसेच यावेळी त्याच्याकडून १२ लाख ८० हजार रुपये किमतीचे ३२ ग्रॅम कोकेन व

१ लाख २० हजार रुपये किंमतीचे ०.२२ ग्रॅम वजनाचे ड.ड.ऊ १५ नग डॉट हा अंमली पदार्थ व १ हजार ९४० रुपयांची रोख रक्कम आणि मोबाईल फोन असा एकुण १४ लाख ०१ हजार ९४० रुपये किंमतीचा हस्तगत करण्यात आल्या आहेत. याप्रकरणी कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करत अटक केली. तसेच वागळे इस्टेट, इंदिरानगर येथे रिक्षातुन गोक अजाह नामक नायजेरीयन इसम कोकेनची विक्रिसाठी येत आहे. अशी माहिती मिळाल्यावर त्या नायजेरियन याच्यासह मुंबईतील साव नामक रिक्षाचालकाला ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ४६ लाखांचा ११५ ग्रॅम कोकेन हा अमली पदार्थ, १ लाखांची रिक्षा व रोख एक हजार एकुण ४७ लाख ०१ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी श्रीनगर पोलीस गुन्हा दाखल करत त्यांना अटक केली. त्या दोन्ही प्रकरणात गुन्हे शाखेमार्फत तपास सुरू आहे. ही कारवाई गुन्हे शाखा वागळे युनिट-५ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विकास घोडके, पोलीस निरीक्षक नितीन पाटील, सहायक पोलीस निरीक्षक भुषण शिंदे, सहायक पोलीस निरीक्षक, अविनाश महाजन, पोलीस उपनिरीक्षक, शिवाजी कानडे, सहायक पोलीस उपनिरीक्षक सुनिल अहिरे, पोलीस हवालदार सुशांत पालांडे, रोहीदास रावते, प्रकाश पाटील, विजय काटकर, सुनिल निकम, न्हावळदे, सुनिल रावते, संदिप शिंदे, मिनाक्षी मोहीते, सुनिता गिते, पोलीस नाईक रघुनाथ गार्डे, उत्तम शेळके, ठाणेकर, यश यादव या पथकाने केली आहे.

# दिवसातील एक तास स्वत:साठी द्या -मनुज जिंदल



**ठाणे :**जागतिक पातळीवर तुमच्या कामाची दखल घेतली जाते तुम्ही उत्तम काम करताय. वैवाहिक जिवनात स्वतः साठी वेळ देणं अवघड असलं तरी दर दिवसातील एक तास स्वतःसाठी द्या, असे मत मुख्यकार्यकारी अधिकारी मनुज जिंदल यांनी व्यक्त केले. महिला व बाल विकास विभाग तर्फे पुरस्कार व कार्यशाळेचे आयोजन नियोजन भवन ठाणे येथे करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

महिला व बाल विकास विभाग तर्फे पुरस्कार व कार्यशाळा सन २०२२-२३ चे मंगळवारी ठाणे जिल्हाधिकरी कार्यालयाच्या आवारातील नियोजन भवन येथे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान आदर्श पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका व विशेष प्राविण्य मिळविलेल्या मुलींचा पुरस्कार सोहळा पार पडला.

यात्रसंगी बोलताना, झेडपीचे मुख्यकार्यकारी अधिकारी मनुज जिंदल यांनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडताना आपल्या अंगणवाडीतील लहान मुलांना मानसिक व शारीरिक सुदृढ करणे गरजेचे आहे. येत्या काळात ० ते ७ वयोगटातील मुली व मुलांसाठी आपण वजन उपक्रम राबवणार आहोत. त्यासाठी तुम्ही सज्ज होऊन काम करावे असे देखील म्हटले. तसेच पुढील वर्षात आपल्या ठाणे जिल्ह्यातील कुपोषित बालकांची संख्या कमी करण्यात आपण पुढाकार घ्यावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. महिला व बाल विकास विभाग प्रमुख यांनी प्रास्ताविक करताना महिलांनी गाव पातळीवर उत्तमरित्या काम केलेच आहे पण वेगवेगळ्या योजना राबवत अनेक समस्यांना सामोरे जात काम केलं आज त्यांचा सन्मान करतांना आम्हाला आनंद होत आहे असेच पुरस्कार सोहळा पुढील वर्षी सुद्धा करु. अशी भावना व्यक्त केली. तसेच जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी महिलांना मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल जाधव, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रुपाली सातपुते, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, जिल्हा आरोग्य अधिकारी गंगाधर परगे, पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका, मदतनीस, आशा सेविका उपस्थित होते.

दरम्यान, पर्यवेक्षिका यांना सन्मान चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस व आशा वर्कर यांनी सन्मान चिन्ह व १० हजार रुपयांचे धनादेश देण्यात आले. तसेच विशेष प्राविण्य मिळविलेल्या कु. डॉली पाटील यांना सन्मान चिन्ह व २० हजार रूपयांचे धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले. थियेटर ऑफ रेलेवंस यांच्या तर्फे लोक-शास्त्र सावित्री मराठी नाटक सादरीकरण केले. जगण्यात सावित्री असावी असा संदेश नाटकाद्वारे महिलांना दिला गेला.

# 'क्लस्टर'ने अडवले, म्हाडात रखडले!

## ठाण्यात सर्वसामान्य रहिवाशांची 'घर-घर'

**ठाणे:** एकीकडे प्रक्रिया सुरू असलेल्या १८ एसआरए प्रकल्पांना क्लस्टर योजनेमुळे खीळ बसली असून हजारो गरीब झोपडीधारक हवालदिल झाले आहेत. तर म्हाडाच्या जागेत प्रकल्प राबवणाऱ्या विकासकाने दहा वर्षे उलटूनही रहिवाशांना घरे दिली नसल्याची बाब आमदार संजय केळकर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार संजय केळकर यांनी ठाणे शहरातील विविध मुद्द्यांना हात घातला. क्लस्टरसारख्या क्रांतिकारक योजनेचे स्वागत करताना केळकर यांनी त्यातील काही कच्च्या दुव्यांना हात घातला. पाठपुराव्यानंतर या योजनेतून अधिकृत इमारतींना वगळण्यात आले, त्यामुळे अधिकृत जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींच्या स्वयं पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. ही योजना राबवत असताना ठाण्यात १८ एसआरए योजना सुरू होत्या. मात्र क्लस्टरमुळे या योजना बंद झाल्या आहेत. त्यामुळे हजारो झोपडीधारक गर्भगळीत झाले आहेत. या योजना क्लस्टरमधून वगळाव्यात, अशी मागणी केळकर यांनी केली.

क्लस्टर योजना राबवण्यासाठी ४४ आराखडे तयार करण्यात आले आहेत. ठाण्यात मिनी क्लस्टर आराखडे तयार केल्यास ते सोयीचे आणि सोपे होईल, अशी सूचना करत याबाबत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना पत्र दिल्याचेही केळकर यांनी सांगितले. एसआरए प्रकल्पांबाबत अनेक समस्या भेडसावत असून रहिवासी मेटाकुटीला आले आहेत. त्यामुळे ठाण्यासाठी स्वतंत्र सीईओ देण्याची मागणीही त्यांनी केली.

वर्तकनगर भागात म्हाडाच्या जागेवर विकासक गृहप्रकल्प राबवत आहेत. एकदंत कन्स्ट्रक्शन या कंपनीने तर दहा वर्षे उलटूनही ३५० लोकांना अद्याप घरे दिली नाहीत. पैसे देऊनही घरे मिळत नसतील तर शासनाने यावर तातडीने कारवाई करून अशा प्रकरणांबाबत ठोस भूमिका घ्यायला हवी, अशी मागणी केळकर यांनी केली.

### शंभर रुपयांत घरांची नोंदणी

**ठाण्यात बीएसयुपी योजनेची दहा हजार घरे असून त्यात गोरगरीब कुटुंबे राहत आहेत. त्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असून निबंधकाकडे घरांच्या नोंदणीसाठी हजारो रुपये जमा करणे त्यांच्या आवाक्याबाहेरील आहे. त्यामुळे अवघ्या १०० रुपयांत त्यांची नोंदणी करून देण्याची मागणी आमदार संजय केळकर यांनी केली.**

# कोरोना रुग्णासाठी छ. शिवाजी महाराज रुग्णालयात आणखी २५ खाटांची व्यवस्था



**ठाणे :** कोरोना रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेवून कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात कोरोना रुग्णासाठी राखीव असलेल्या विशेष वॉर्डबरोबरच आणखी २५ खाटांची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचबरोबर, रुग्ण संख्या आणि खाजगी हॉस्पिटलमधील कोरोना रुग्ण यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवण्याचे निर्देश ठाणे महापालिकेचे आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले आहेत.

सध्या ठाण्यात कोरोनाचे एकूण २५२ रुग्ण आहेत. कोविडबाधित रुग्णांची संख्या वाढणे सुरू झाल्यापासून ०५ कोविडबाधितांचा मृत्यू झाला आहे. याबद्दल तज्ज्ञांचे मत घेतले असता असे दिसून येते की, ज्येष्ठ नागरिक, उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, इतर गंभीर सहव्याधी यांच्यासह कोविडमुळे या रुग्णांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, रुग्णांच्या मृत्यूचे 'डेथ ऑडिट' करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. तसेच, नागरिकांनी कोविड सदृश लक्षणे असतील तर आजार अंगावर काढू नये. तसेच, ज्येष्ठ नागरिक, व सहव्याधी असलेल्या रुग्णांची विशेष काळजी घेण्याचे आवाहन आयुक्त बांगर यांनी केले आहे.

कोरोनाच्या वाढत्या रुग्ण संख्येमुळे सगळ्यांनी सतर्क राहणे गरजेचे आहे. जास्तीत जास्त लोकांच्या चाचण्या करून रुग्ण संख्येचा अभ्यास करणे हे कोरोनाच्या एक पाऊल पुढे राहण्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे कोरोना चाचण्यांचे प्रमाण वाढवावे. चाचण्या अधिक केल्यामुळे रुग्ण संख्या वाढण्याची शक्यता ।आहे. मात्र, कोविडबाबतच्या 'चाचणी, विलगीकरण, उपचार' या प्रोटोकॉल प्रमाणे अधिकाधिक रुग्ण विलगीकरणात ठेवणे व उपचार करणे आवश्यक ठरते. त्यामुळे, चाचणी केंद्रे एकही दिवस बंद ठेवू नयेत. त्याचबरोबर, सार्वजनिक ठिकाणे, मार्केट, रेल्वे स्टेशन, मॉल आदी ठिकाणी चाचणीची व्यवस्था तत्काळ केली जावी, असे आयुक्त बांगर यांनी स्पष्ट केले.

ऑक्सीजन साठा, चाचणीच्या किट्सची पुरेशी उपलब्धता, औषधांचा पुरवठा यांच्याबद्दल काटेकोरपणे दक्ष राहावे, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात कोरोना रुग्णासाठी राखीव असलेल्या विशेष वॉर्ड बरोबरच आणखी २५ खाटांची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी कोविड काळात नेमण्यात आलेले डॉक्टर आणि कर्मचारी यांची सेवा तत्काळ छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे उपलब्ध करून देण्याचे निर्देश देताना त्यांनी कोविडबाधित रुग्ण व्यवस्थापनात सदर कर्मचाऱ्यांचा कार्यक्षमपणे वापर होईल याची दक्षता घ्यावी असे त्यांनी नमूद केले.

# ठामपा विद्यार्थींनीना 'गुड टच-बॅड टच'बद्दल मार्गदर्शन



**ठाणे :** ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेड, ठाणे महापालिकेचा शिक्षण विभाग आणि मीमांसा ही स्वयंसेवी संस्था यांच्या वतीने महापालिका शाळेतील विद्यार्थीनींसाठी नुकतीच 'गुड टच-बॅड टच' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शाळा क्रमांक २३ मध्ये झालेल्या या कार्यशाळेत, इयत्ता पाचवी ते नववीच्या २१८ विद्यार्थीनी सहभागी झाल्या.

महिलांमध्ये जागरुकतेसाठी ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेडच्या माध्यमातून विविध उपक्रम आयोजित केले जात आहेत. त्याच अंतर्गत विद्यार्थीनींना मार्गदर्शन करण्यासाठी 'गुड टच-बॅड टच' या विषयावरील कार्यशाळा आयोजित करण्यात येत असल्याचे ठाणे स्मार्ट सिटी लिमिटेडचे सीईओ आणि पालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी यांनी सांगितले.

या कार्यशाळेत, विद्यार्थीनींना 'गुड टच-बॅड टच' ही संकल्पना त्यात घ्यायची खबरदारी याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

कला आधारित थेरपी आणि थिएटरच्या तत्त्वांचा वापर करून कार्यशाळा घेण्यात आली. त्यासाठी, 'मीमांसा'च्या टीममधील क्लिनिकल सायकोलॉजिस्ट, स्पेशल एज्युकेटर्स आणि रेमेडियल एज्युकेटर्स सहभागी झाले होते. त्यांनी स्क्रिट्स सादर करून विद्यार्थिनींना संकल्पना समजावून सांगितल्या. काही व्हिडिओही दाखवले.

'मीमांसा' ही स्वयंसेवी संस्था गेली नऊ वर्षे ठाणे महानगरपालिकेसोबत कार्यरत आहे. तसेच, ठाण्यातील अनेक शाळांसोबतही काम करते. 'मीमांसा'चे विश्वस्त आणि अभिनेता, लेखक, दिग्दर्शक चिन्मय मांडलेकर यांनीही या कार्यशाळेत संवाद साधला. शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संवादाने कार्यशाळेची सांगता झाली.

## मुंब्र्यात नागरिकांचे आरोग्य धोक्यात

# नळाला पिण्याचे पाणी दूषित

### पाणीपुरवठा सुरळीत नाही निदान पिण्यायोग्य पाणी तरी द्या

### काँग्रेसची मागणी



**ठाणे:** मुंब्रा येथील शंकर मंदिर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, शिवाजी नगर, अमृत नगर या परिसरात ठाणे महापालिकेकडून दिवसांतून अवघे दोनच तास मिळणाऱ्या पिण्याच्या पाण्याचा काल पासून दूषित पाणीपुरवठा होत आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. हे दूषित पाणी प्यायल्यास कावीळ, उलट्या, जुलाब यासारखे आजार होण्याची शक्यता असल्याने आरोग्याच्या दृष्टीने अपायकारक ठरत आहे. मुंब्र्याला पाणीपुरवठा सुरळीत नाही, निदान पिण्याचे पाणी तरी योग्य मिळावे अशी मागणी काँग्रेसचे ठाणे शहर प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी केली.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रा अंतर्गत विविध भागात फुटलेल्या जलवाहिन्या, जलवाहिन्यांची दुरुस्ती इ. कामाच्या अनुषंगाने, कमी दाबाने होणारा पाणी पुरवठा व नळास अति दूषित पाणी येणार असल्यास ते पिणे टाळावे, औषधांचा वापर करावा व काही दिवस पाणी उकळून व गाळून पिण्यासंबंधी नागरिकांना जाहीर आवाहन करत योग्य त्या उपाय योजना करणे गरजेचे आहे. तसेच पाण्याची रंग व चव बदलली असल्यास नमुने घेऊन त्याची चाचणी होणे गरजेचे आहे ही बाब मागील आठवड्यातच महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या निवेदन पत्राद्वारे ठाणे काँग्रेसचे प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर देखील महापालिकेकडून मुंब्र्यात दुषित पाणीपुरवठा सुरूच आहे. पाणीपुरवठा देखील दिवसांतून केवळ दोनच तास होत आहे. किमान हे पाणी तरी पालिकेने पिण्यायोग्य पुरवावे अशी मागणी त्यांनी केली आहे.




# दिव्यात हॉस्पिटल व्हावे म्हणून जनआंदोलन

**५ लाख लोकसंख्या असणाऱ्या दिवा शहरात पालिकेचे रुग्णालय व्हावे यासाठी सामाजिक कार्यकर्त्या व भाजपच्या दिवा महिला अध्यक्षा**

## ज्योती राजकांत पाटील

**यांनी १० एप्रिल रोजी आंदोलन पुकारले आहे...!**





**दिवा शहरात पालिकेचे रुग्णालय नसल्याने..**

- रात्री अपरात्री एखादी व्यक्ती गंभीर आजारी पडली तर त्या पेशंटला उपचारासाठी ठाणे, डोंबिवली, मुंबई येथे जावे लागते...
- सर्व सामान्य कुटुंबातील गरोदर महिलांना उपचारासाठी डोंबिवली, ठाणे येथे जावे लागते...
- एखाद्या पेशंटला हार्ट अटॅक आला किंवा प्यारालायसिसचा झटका आला तर त्याला तात्काळ दिव्यात उपचार मिळण्याची सुविधा नाही...पेशंटला ठाणे, डोंबिवली येथे नेई पर्यंत उशीर होतो...

दिवा शहरातील ५ लाख लोकसंख्येच्या आरोग्याचा विचार आजपर्यंत झाला नाही...

या गंभीर समस्येकडे पालिका प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी १० एप्रिल रोजी... **सौ.ज्योती राजकांत पाटील** या शेकडो महिलांसह दिवा प्रभाग समिती समोर धरणे आंदोलन करणार आहेत....

दिवा वासीय म्हणून आपण सर्वांनी आपल्या आरोग्याचा विचार करून या आंदोलनात सहभागी व्हावे...

लोकांना हा गंभीर विषय समजण्यासाठी जास्तीत जास्त लोकांना याबाबत जनजागृती करून या लढयात आपले योगदान द्या!

## दिवा सार्वजनिक रुग्णालय हक्क समिती
## भारतीय जनता पार्टी,दिवा महिला मोर्चा